/

क्र. अपोमसं/प्रशि/पोभ-२०१४/मार्गदर्शक तत्वे/२०१४ /1779 मुंबई दि. /०४/२०१४

**विषय :- पोलीस शिपाई पदाच्या भरतीबाबतची कार्यपद्धती** 23 APR 2014

****

**परिपत्रक :**

पोलीस महासंचालक यांच्या आदेशानुसार सन २०१४ ची पोलीस भरती प्रक्रिया ही घेण्याची प्रस्तावित आहे. सदरची पोलीस भरती राज्यातील सर्व संबंधित पोलीस घटकामध्ये एकाच वेळी घेण्यात येणार. याबाबतीत निवडणूक आयोगाकडुन परवानगी प्राप्त होताच भरतीप्रक्रिया सुरु करण्यात येईल.

पोलीस भरती प्रक्रिया ही सुरळीत, सुलभ व पूर्ण पारदर्शकता ठेवून करण्यासाठी शासनाने शासन निर्णय क्र. आरसीटी-०३११/प्र. क्र.२२८/पोल-५अ दि. १६/०६/२०११ अन्वये पोलीस शिपाई सेवाप्रवेश नियम २०११ निर्गमित केले आहेत. सदरचे सेवाप्रवेश नियम सर्व घटक प्रमुखांना या कार्यालयाचे ज्ञापन क्र. प्रशि/पोशि-भरती-२०११/सुधारीत सेवाप्रवेश नियम-११/२०११/२९९८, दि. ०५/०७/२०११ अन्वये वर्तुळीत करण्यात आले आहेत (सदरचे नियम https://mahapolice.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे). शासनाने निर्गमित केलेल्या सुधारीत सेवाप्रवेश नियमानुसार पोलीस भरती घेण्याची सर्व घटक प्रमुखांनी दक्षता घ्यावी.

राज्य राखीव पोलीस बल गटातील पोलीस भरतीसाठी शासनाने शासन निर्णय क्र. आरटीआर-०३१२/प्र.क्र. २३४/पोल-५अ, दि. ०८/१०/२०१२ अन्वये " महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष)(सेवाप्रवेश नियम) २०१२" निर्गमित केले आहेत. तरी समादेशक, राज्य राखीव पोलीस बल यांनी सदर सेवाप्रवेश नियमानुसार पोलीस भरती घेण्याची दक्षता घ्यावी.

१. **रिक्त पदांची गणना :-** रिक्त पदांचा आढावा घेताना दि. ३१/१२/२०१४ पर्यंत प्रत्यक्षात होणारी रिक्त पदे, सेवानिवृत्ती, पदोन्नती, जिल्हा बदली तसेच विविध घटकांकडे प्रतिनियुक्तीवरुन पाठविण्याची पदे गृहित धरुन रिक्त पदांची गणना करावी. सदरची गणना करताना या कार्यालयाच्या क्र. अपोमसं/प्रशि/पोभ/पोशि-भरती-२०१४/११५१/२०१४ दि. १२/०३/२०१४ च्या ज्ञापनान्वये दिलेल्या सुचनेनूसार सर्व बाबी विचारात घेवून बिनचूक परिगणना करावी व ती माहिती सामाजिक आरक्षणाच्या तपशिलासह अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म. रा. मुंबई यांच्या कार्यालयात ३ दिवसांत कळविण्यात यावी.

२. **वयोमर्यादा निश्चितीकरिता दिनांक :- (Cut off Date) :** पोलीस शिपायांच्या भरतीकरिता उमेदवारांच्या वयोमर्यादेची दिनांक **(Cut off Date)** नंतर कळविण्यात येईल.

३. **जाहिरात :-** शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. संकिर्ण/१०३३/प्र. क्र.९६/२००३/१३, दि.१९/११/२००३ चे परिपत्रकानुसार व सुधारीत सेवाप्रवेश नियम - २०११ मधील नियम ७ मधील तरतूदीनुसार जाहिरात देण्यात यावी. जाहिरातीचा नमूना यासोबत पाठविण्यात येत आहे. **स्थानिक पातळीवर त्यात कोणतेही बदल करण्यात येवू नयेत. असे बदल करावयाची आवश्यकता भासल्यास या कार्यालयाची पूर्वपरवानगी घेण्यात यावी.**

**पोलीस भरतीकरिता उपलब्ध असलेली सामाजिक व समांतर आरक्षणाची पदे जाहिरातीत नमूद करावीत. उमेदवारांकरिता सखोल माहिती महापोलीसच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेली आहे.**

४. **आवेदन अर्ज :-** (Application Form): २०१४ ची पोलीस शिपाई भरती ही ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहे. त्याकरिता महाऑनलाईन लि. या संस्थेची निवड करण्यात आली आहे. उमेदवारांकडून आवेदन अर्ज भरुन घेण्याकरिता https://mahapolice.mahaonline.gov.in हा U.R.L. निर्माण करण्यात आला आहे. उमेदवारांना अर्ज दोन प्रकारे भरता येईल.

**अ) <u>इंटरनेटव्दारे ऑनलाईन:-</u>** उमेदवार सदर वेबसाईटवर जाऊन त्यावरील सुचनांचे अवलोकन करुन अर्ज भरु शकतात. ई-मेल आय-डी पडताळणी (verification) करणे अनिवार्य आहे. उमेदवारांनी अर्जात ई-मेल आयडी तसेच मोबाईल नंबर नमुद केला असेल पुर्ण भरलेल्या अर्जाबाबतचे पुष्टीकरण (Confirmation) देण्यात येईल. उमेदवारांना त्यांच्या क्रेडीट / डेबिट कार्ड व्दारे / NEFT व्दारे किंवा भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत चलनाव्दारे शुल्क भरता येईल. एकुण शुल्क रु. १५०/- एवढे राहील.

**ब) <u>महा-ई सेवा केंद्र (C.S.C.) :-</u>** महाऑनलाईन लि. या संस्थेकडुन प्रत्येक जिल्ह्यात महा-ई सेवा केंद्र (C.S.C.) उघडण्यात आलेले आहेत. ज्या उमेदवारांना इंटरनेटव्दारे स्वत: अर्ज भरावयाचा नसेल असे उमेदवार महा-ई सेवा केंद्रामार्फत आपला आवेदन अर्ज भरु शकतात. त्याचवेळेस उमेदवारांकडुन फक्त <u>रु. १५०/-</u> एवढी रोख रक्कम घेतली जाईल, याव्यतीरिक्त कुठलेही इतर शुल्क देय नाही. या सुविधामध्ये आवेदन अर्ज भरणे, पैसे भरल्यानंतर ट्रॅन्झॅक्शन आयडी तयार करणे इत्यादींचा समावेश असेल. उमेदवारास पैसे भरल्याची पावती (Receipt) महा-ई सेवा केंद्रातर्फे देण्यात येईल. इतर कोणत्याही कागदपत्रांच्या प्रती जर महा-ई सेवा केंद्रा (C.S.C.) कडून हव्या असतील तर, सदरच्या प्रती रु. ३/- प्रती पान या दराने उपलब्ध होऊ शकतील. फॉर्म भरताना उमेदवाराने स्वत:चा ई-मेल आय-डी देणे आवश्यक आहे. त्याचेकडे ई-मेल आय-डी नसल्यास केंद्र

चालक उमेदवाराच्या सांगण्याप्रमाणे त्याचा वैयक्तीक ई-मेल आय-डी तयार करुन पडताळणी (verification) करतील. याकरिता कुठलेही अतिरीक्त शुल्क घेतले जाणार नाही.

५. **प्रवेश पत्राचे वाटप :-** ऑनलाईन आवेदन अर्ज संपुर्ण भरुन झाल्यानंतर वेळापत्रकाप्रमाणे उमेदवाराला प्रवेश पत्र (Admit Card) पाठविण्यात येईल. या प्रवेशपत्रामध्ये हजर राहण्याची तारीख, वेळ व ठिकाण इत्यादी गोष्टींचा समावेश असेल. प्रवेश पत्र महाऑनलाईन मार्फत उमेदवाराच्या ई-मेल वर पाठविण्यात येईल. उमेदवारास सदर प्रवेशपत्राची प्रिंट आऊट घेऊन भरतीचे वेळी व ठिकाणी हजर रहावे लागेल. सदर प्रवेशपत्राची प्रिंट आऊट उमेदवार स्वत: https://mahapolice.mahaonline.gov.in या संकेतस्थळावरील आपले प्रोफाईल वर जाऊन घेऊ शकतात. अथवा प्रवेशपत्राची प्रिंट आऊट महा-ई सेवा केंद्रावर (C.S.C.) रु. ३/- प्रती प्रत दराने उपलब्ध करुन घेऊ शकतात.

उमेदवारांना पोलीस भरतीच्या संपुर्ण प्रक्रियेची रुपरेखा (Schedule) https://mahapolice.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. तसेच सर्व घटक प्रमुख संबंधित मुख्यालयाच्या नोटीस बोर्डवर तसेच घटक प्रमुखांना आवश्यक वाटेल अशा इतर ठिकाणीही ठळक अक्षरात भरती प्रक्रियेची रुपरेखा (Schedule) उपलब्ध करुन देतील. सदर वेबसाईटची लिंक महापोलीसच्या संकेतस्थळावर उपलब्ध राहिल.

६. **प्रमाणपत्रांचा निश्चीती दिनांक (cut off date):-** अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत सर्व प्रमाणपत्रे व अर्हता प्राप्त करुन घेणे उमेदवारांवर बंधनकारक राहिल म्हणजेच अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांकानंतर प्राप्त करुन घेण्यात आलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार नाही. गृहविभाग शासन पत्र क्र. आरसीटी-०३१०/प्र. क्र. २१२/पोल -५अ, दि. १६/०४/२०१० नुसार क्रिमीलीयरचे तत्व लागू करण्यात आलेल्या मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांना जाती प्रमाणपत्र व उन्नत व प्रगत वर्गात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अशी दोन्ही प्रमाणपत्रे असतील तरच आरक्षण विषयक लाभ देय ठरतो. ही दोन्ही प्रमाणपत्रे नसतील तर आरक्षण विषयक लाभ देय ठरणार नसून अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील उमेदवार समजण्यात यावे व खुल्या प्रवर्गासाठी असलेल्या वयोमर्यादेच्या अटी त्यांना लागू राहतील.

७. **निवड मंडळ :-** मा. पोलीस महासंचालक यांनी खालील प्रमाणे निवड मंडळ गठित केलेले आहे.

a. पोलीस आयुक्त / पोलीस आयुक्त यांनी निर्देशीत केलेले अपर पोलीस आयुक्त पेक्षा कमी दर्जा नसलेले अधिकारी / पोलीस अधिक्षक / समादेशक - **अध्यक्ष**
b. अल्पसंख्यांक समाजाचा पोलीस अधिकारी - **सदस्य**
c. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी - **सदस्य**

d. समाजकल्याण अधिकारी - **सदस्य**

e. आदिवासी विकास अधिकारी - **सदस्य**

f. पोलीस बँड पथकातील उमेदवार निवडीसाठी गठित करावयाच्या समितीत शक्यतो भारतीय सैन्य दलाच्या बँड पथकातील अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात यावा.

८. **शारीरिक पात्रता व शारीरिक चाचणी :-** उमेदवार भरती प्रक्रिये करिता मैदानावर प्रथमत: उपस्थित झाल्यानंतर एका हजेरीपटावर त्याची सही करुन घ्यावी. हजेरी पट https://mahapolice.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असणार आहे त्या हजेरीपटावर अनुक्रमांक, उमेदवाराचे नाव व बैठक क्रमांक, उमेदवाराच्या फोटोची प्रिंट सहीसह, व उमेदवार हजर झाल्यानंतर त्याचे स्वाक्षरीकरिता रकाना उपलब्ध राहणार आहे. घटकप्रमुखांनी दिलेल्या शेड्युल प्रमाणे हजेरीपट तयार करुन पाठविण्यात येईल. संबंधित अधिका-यांनी उमेदवाराचा आवेदन अर्जावरील फोटो शारीरिक पात्रता व शारीरिक चाचणीच्या वेळी उपस्थित राहिलेल्या उमेदवाराशी जुळवून सदर उमेदवार तोच असल्याची खात्री करावी. प्रमाणपत्रांची पडताळणी झाल्यानंतर उमेदवारांची छाती व मोजमाप घ्यावे. **पोलीस भरती पारदर्शक पद्धतीने होण्याकरिता उमेदवारांची उंची मोजण्याकरिता असलेले उंची मोजमापाचे स्टँड हे वैधमापन शास्त्र (वजनमापे) यांचे जिल्हा पातळीवरील अधिकारी यांचेकडून भरती प्रक्रिया सुरु होण्यापुर्वी प्रमाणित करुन घ्यावे.** भरतीच्या स्थळी उमेदवारांकडून त्यांच्या उंची / छातीचे मोजमापाबाबत तक्रार आल्यास सदर कामी नेमणूकीस असलेल्या पोलीस उपअधिक्षक (गृह) /उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी शक्यतो घटक प्रमुख यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली फेर मोजमाप घ्यावे व त्याचा तपशील स्वत: भरती नोंदवहीत नोंदवावा. उमेदवाराच्या उंचीच्या मोजमापाबाबत खात्री झाल्याशिवाय उमेदवारास पुढील चाचणीकरिता बसण्याची परवानगी देण्यात येवू नये. विहित शारीरिक पात्रतेनुसार अपात्र ठरविण्यात आलेल्या उमेदवारांना लेखी लगेचच कळवावे. शारीरिक पात्रता व शारीरिक चाचणी घेताना जास्तीत जास्त तंत्रज्ञानाचा वापर करण्याची सर्व घटकप्रमुखांनी दक्षता घ्यावी.

सेवाप्रवेश नियम २०११ शासन निर्णय क्र. आरसीटी-०३११/प्र.क्र. २२८/पोल -५ अ, दि. १६/०६/२०११ नुसार शारीरिक चाचणी घेण्यात यावी. परिशिष्ट "अ" मध्ये जोडलेल्या तक्त्याच्या अनुषंगाने गुण देवून प्रत्येक प्रात्यक्षिक संपल्यानंतर उमेदवाराला त्याचे गुण कळवावेत, प्रत्येक दिवशी प्रात्यक्षिक संपल्यानंतर उमेदवारांना प्राप्त झालेल्या गुणांची यादी मुख्यालयाच्या नोटीस बोर्ड वर व संकेतस्थळावर लावण्यात यावी.

**९. लेखी परीक्षा :** शारीरिक चाचणी मध्ये कमीत कमी ५०% गुण मिळवून १:१५ या प्रमाणकानुसार निवड यादी गृहविभाग परिपत्रक क्र. एमआयएस-२००८/प्र.क्र.५१८/पोल-५अ, दि.२६/०८/२००८ मध्ये दिलेल्या मार्गदर्शन तत्वानुसार

तयार करावी. या निवडयादीवर शेवटच्या उमेदवारास जेवढे गुण मिळालेले आहेत.त्या समान गुण मिळविणा-या सर्व उमेदवारांची १०० गुणांची लेखी परीक्षा घेतली जाईल. **लेखी चाचणी मराठी भाषेत घेण्यात येईल.**

**लेखी परिक्षा OMR पद्धतीने घेण्यात यावी. OMR पद्धतीने परिक्षा घेण्याकरिता प्रतिष्ठीत संस्थाकडुनच करार करण्यात यावे. सन -२०१३ च्या पोलीस भरतीमध्ये संगणकाव्दारे तपासलेल्या उत्तर पत्रिकेमध्ये चुक आढळुन आली होती, याकरिता उत्तरप्रत्रिकेची तपासणी झाल्यानंतर नमूना चेक (Random sampling) करण्यात यावा.**

**बॅन्ड्समन पदाकरिता इयत्ता १० वी उत्तीर्ण उमेदवार पात्र असल्याने त्यांची वरील प्रमाणे वेगळी लेखी परीक्षा घेण्यात यावी.**

लेखी परीक्षा झाल्यानंतर ४ तासांच्या आत सर्व घटक प्रमुखांनी नमुना उत्तरपत्रिका (Model Answersheet) सुचना फलकावर लावण्यात यावी. लेखी परीक्षेचा निकाल शक्यतो २४ तासामध्ये जाहिर करावा. उमेदवारांची संख्या मोठी असल्यास निकाल लवकरात लवकर सुचना फलकावर लावण्यात यावा. तसेच वेबसाईटवर ही उपलब्ध करुन देण्यात यावा.

जर कोणत्याही उमेदवाराने उत्तर पत्रिकेतील गुणांबद्दल निकाल जाहिर झाल्यानंतर तक्रार केल्यास व उत्तरपत्रिकेची परत तपासणी करण्याची ४८ तासाचे आत मागणी केल्यास ती स्विकारण्यात येईल. उत्तरपत्रिका तपासणेकरिता पोलीस उपआयुक्त / पोलीस उपअधिक्षक यांना प्राधिकृत करुन त्यांचेकडून उत्तरपत्रिकेची फेरतपासणी करण्यात यावी, परंतू त्याकरिता उमेदवाराकडून रु. २००/- इतकी अतिरिक्त फी आकारण्यात येईल. यासंबंधी पोलीस उपआयुक्त / पोलीस उप अधिक्षक यांचा निर्णय अंतिम राहील.

**१०.गुणवत्ता यादी :-** उमेदवारांची " शारीरिक चाचणी " व " लेखी चाचणी " गुण एकत्रित करुन गुणवत्ता यादी तयार करावी. **बॅन्ड्समनची स्वतंत्र गुणवत्ता यादी तयार करावी.** शेवटच्या उमेदवारांची लेखी चाचणी परीक्षेचा निकाल लागल्यानंतर शक्यतो २४ तासात अथवा उमेदवारांची संख्या मोठी असल्यास लवकरात लवकर भरतीचा अंतिम निकाल सूचना फलकावर लावुन जाहिर करण्यात यावा. २४ तासांच्या आत अंतिम निकाल जाहिर करणे शक्य नसल्यास, सूचना फलकावर तशा सूचना लिहून निश्चित तारीख व वेळ उमेदवारांना कळविण्यात यावी. तसेच निकाल वेबसाईटवर उपलब्ध करुन द्यावा.

**११. वैद्यकिय तपासणी :-** सुधारीत सेवाप्रवेश नियमातील तरतूदीनुसार निवड झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी संदर्भात महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील तरतूदी तसेच शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या तरतूदी लागू होतील. याशिवाय तोतरेपणाची चाचणी घेण्यात यावी.

निवड करण्यात आलेले जे उमेदवार वैद्यकीय दृष्टया पात्र ठरतील त्यांना आरक्षित पदानुसार पोलीस शिपाई पदासाठी योग्य समजण्यात यावे. ह्या उमेदवारांची साक्षांकन नमुना व चारित्र्य पडताळणी करुन घेण्यात यावी. याबाबत शासनाने निर्गमित केलेल्या सुधारीत सेवाप्रवेश नियम - २०११ मधील नियम ५ चे अवलोकन करुन त्यानुसार कार्यवाही करणे नियुक्ती प्राधिका-यावर बंधनकारक राहील. व जे योग्य उमेदवार असतील त्यांची शिपाई पदावर नेमणुक करावी. बॅन्ड्समन पदासाठी निवड केलेल्या उमेदवारांची वेगळी गुणवत्ता यादी तयार करुन सदरची पदे भरावीत.

**१२.निवड यादी व प्रतिक्षायादी:-** प्रतिक्षायादी फक्त त्या भरतीमधील निवड झालेला उमदेवार अपात्र ठरल्यास / गैरहजर राहील्यास लागू होईल. भविष्यात रिक्त होणा-या पदांसाठी सदरची निवड यादी लागू होणार नाही. तसेच भरतीच्या वेळी जितक्या जागा अधिसुचित करण्यात आल्या असतील तेवढयाच जागांची निवड यादी (प्रतिक्षा यादीसह) **ही सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. प्रनिमं/२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दि. २७/०६/२००८ व प्रनिमं/२०११/प्र.क्र.९९/११/१३-अ, दि. २६/१२/२०११ मधील तरतुदीनुसार अस्तित्वात राहील.**

**१३.विशेष सुचना :-**

i. महा-ई सेवा केंद्रावर संबंधित घटक प्रमुखांनी योग्य ते लक्ष ठेवावे, जेणेकरुन कोणताही गैरप्रकार तेथे घडणार नाही.

ii. **सर्व घटक प्रमुखांनी त्यांच्या बँकेच्या खात्यांची सविस्तर माहिती (Bank Account Details) ई-मेल व्दारे या कार्यालयास पाठवावी.**

iii. घटकप्रमुख उमेदवारांना बोलाविण्याचा दिनांक, वेळ व ठिकाण प्रत्येक सत्रामध्ये किती उमेदवार बोलवावयाचे आहेत, याची संख्या तसेच कोणत्या प्रवर्गातील उमेदवारांना बोलवावयाचे आहे, याची संपूर्ण माहिती परस्पर महाऑनलाईनला त्यांच्या ई-मेल **support@mahaonline.gov.in** वर कळवतील, जेणेकरुन त्यानुसार उमेदवारास प्रवेशपत्र निर्गमित करण्यात येईल.

iv. भरती प्रक्रिया ही तटस्थपणे, नि:पक्षपातीपणे व पारदर्शक (Neutral, Impartial & Transparent) होणे आवश्यक असून भरती प्रक्रियेत कोणताही गैरप्रकार व भ्रष्टाचार होणार नाही यासाठी आयुक्तालयातील भरतीकरिता पोलीस आयुक्त हे " दक्षता अधिकारी " म्हणून काम पाहतील तसेच जिल्हयातील परिक्षेत्रांतर्गत येणा-या पोलीस घटकात होणा-या भरतीमध्ये " दक्षता अधिकारी " म्हणून त्या त्या परिक्षेत्रातील विशेष पोलीस महानिरीक्षक हे काम पाहतील. राज्य राखीव पोलीस बलामधील भरती

प्रक्रियेवर पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर हे " दक्षता अधिकारी " म्हणून काम पाहतील.

v. पोलीस भरती प्रक्रिये दरम्यान गैरशिस्त व अशोभनीय वर्तन न करणेबाबत या कार्यालयाकडून परिपत्रक क्र. प्रशि/प्रलि/पोभ/गैरशिस्त/२०११/९३९, दि. ०१/०३/२०११ अन्वये दिलेल्या सुचनेचे अवलोकन करावे.

vi. भरतीच्या प्रक्रिये दरम्यान खंड न देता ती सलगपणे लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावी जेणे करुन भरतीच्या कामाचा ताण कमी कमी होत जावून विनाकारण तक्रारी करण्यास कोणासही वाव मिळणार नाही.

vii. घटक प्रमुखांनी व दक्षता अधिकारी यांनी पोलीस भरतीच्या वेळी दक्ष राहून भरती प्रक्रिया व्यवस्थित होत आहे याची काळजी घ्यावी व त्याप्रमाणे पोलीस बंदोबस्त ठेवावा. भरतीकरिता नेमणूक केलेल्या अधिका-यांना / कर्मचा-यांना वेगळे ओळखपत्र द्यावे. व ते त्यांनी भरतीच्या वेळी गणवेषावर लावणे बंधनकारक राहील. बाहेरील कोणत्याही व्यक्तींना भरती परिसरात प्रवेश देऊ नये. **भरती परिसरात नेमलेले अधिकारी आणि कर्मचारी मोबाईल फोनचा वापर करणार नाहीत** याची दक्षता कटाक्षाने घेण्यात यावी. उमेदवारांच्या सोयीसाठी जागोजागी सूचनांचे फलक लावावे. P. A. System, फिरते प्रसाधन गृहांची (Mobile Toilets) इ. व्यवस्था करावी. भरती कालावधीत वैद्यकीय सेवेची सोय, पिण्याचे पाणी, उपहार गृह इत्यादीची भरतीप्रक्रिये पुरती सोय करावी.

viii. भरतीच्या ठिकाणी संबंधीत पोलीस घटकातील पोलीस आयुक्त / पोलीस अधिक्षक / समादेशक / परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / परिक्षेत्रीय ला.लु.प्र.वि. चे पोलीस अधिक्षक / महासंचालक ला. लु. प्र. वि. म.रा. मुंबई तसेच पोलीस महासंचालक म. रा. मुंबई यांचे नियंत्रण कक्ष अधिकारी यांची नावे, दुरध्वनी व फॅक्स क्रमांक एका फलकावर ठिक-ठिकाणी लावण्यात यावेत. जेणेकरुन भरतीसंदर्भात कोणालाही तक्रार करावयाची असल्यास ते करु शकतील.

ix. पोलीस भरतीकरिता सुधारीत केलेल्या सेवाप्रवेश नियम - २०११ व महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष)(सेवाप्रवेश नियम) - २०१२ त्यासंबंधातील शासन निर्णयांची व मार्गदर्शक तत्वांचा बारकाईने अभ्यास करुन त्यानुसार पोलीस भरतीबाबत कार्यवाही करणे घटक प्रमुखांवर बंधनकारक राहील.

x. उमेदवारांचे चारित्र्य व पुर्व चारित्र्य याची पडताळणी करणेकामी उमेदवारांकडून सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. चापअ-१००८/प्र. क्र. ५७/२००८/१६ अ, दि. ३०/०९/२००८ अन्वये निर्गमित केलेला

सुधारीत साक्षांकन नमुना भरुन घेण्याची दक्षता घ्यावी व पोलीस शिपाई पदावर सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. चापअ-१००८/प्र. क्र. ५७/२००८/१६ अ, दि. ३०/०९/२००८ मधील तरतुदीनुसार चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त झाल्याशिवाय या उमेदवारांची नियुक्ती करण्यात येऊ नये. उमेदवारांविरुद्ध गुन्हे दाखल असल्यास वरील नियमांनुसार कार्यवाही करावी.

१४. उमेदवारांना काही अडचणी भासल्यास खाली दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर सकाळी ०९.३० ते रात्री ०८.०० या वेळेत संपर्क साधावा.

a. महाऑनलाईन संदर्भात अडचण असल्यास :- ०२२- ६१३१६४००

b. भारतीय स्टेट बँकेच्या संदर्भात अडचण असल्यास :- ०२२-२२६६१७६५

c. महा ई-सेवा केंद्र (CSC) संदर्भात अडचण असल्यास

i. Basics (Nashik Division) :- ८३८००१८२५७ (मोबाईल नंबर)

ii. cm-(Amravati Division, Aurangabad Division) :- ०२२-४१२५९१२२/६९

iii. SPANCO – (Konkan Division, Pune Division) :- ०२०-२४६०५०००

iv. MahaOnline – (Nagpur Division) :- ०२२-६१३१६४००

१५. या परिपत्रकात नमूद केलेले सर्व परिपत्रके व शासननिर्णय यासोबत जोडलेले आहेत.

(एस. पी. गुप्ता)
**अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके,**
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त, (लोहमार्गसह).
सर्व पोलीस अधिक्षक, (लोहमार्गसह).
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १ ते १६.
व्यवस्थापक, महाऑनलाईन लि. मुंबई.

प्रत सविनय सादर,

अपर मुख्य सचिव, गृहविभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महासंचालक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत सस्नेह,

आयुक्त, राज्य गुप्त वार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

अपर पोलीस महासंचालक, का. व सु./ आस्थापना / प्रशासन / नि.व.स. / राज्य राखीव पोलीस बल / लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, ७ वा मजला, मंत्रालय, मुंबई.

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक.

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल नागपूर / पुणे.

पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, गडचिरोली.

**महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन २०१४**

येथे घटकांचे नाव नमूद करावे.

**जाहिरात क्रमांक** **ठिकाण** **दिनांक / /२०१४**

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ आणि शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या अटी व शर्तीनुसार ------------------ (घटकांचे नाव) खालील नमूद पदांसाठी पोलीस भरती आयोजित करण्यात येत आहे.

१. **पोलीस शिपाई :**

| | **खुला** | **अजा** | **अज** | **विज-अ** | **भज-ब** | **भज-क** | **भज-ड** | **विमाप्र** | **इमाव** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकूण** | | | | | | | | | | |
| कप्पीकृत आरक्षण | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | | | | | | | | | | |
| महिला | | | | | | | | | | |
| खेळाडु | | | | | | | | | | |
| प्रकल्पग्रस्त | | | | | | | | | | |
| भुकंपग्रस्त | | | | | | | | | | |
| माजी सैनिक | | | | | | | | | | |
| अंश-पदवीधर | | | | | | | | | | |
| गृहरक्षक दल | | | | | | | | | | |
| इतर | | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | | |

**वर दर्शविलेली पदे व आरक्षण यात बदल होण्याची शक्यता आहे.**

२. **बँडस्मन :** वर नमूद पदांपैकी --------------- पदे उपलब्धतेनुसार बँडस्मन पदांमधून भरली जातील.

**पोलीस शिपाई सेवाप्रवेश नियम -२०११ हे** https://mahapolice.mahaonline.gov.in **या संकेत स्थळावर (Home Page) उपलब्ध असुन ते सर्व उमेदवारांना लागू राहतील.**

जाहिरातीत नमुद अटींची पुर्तता करणारे उमेदवार यांनी खाली दिलेल्या विहीत दिनांकाच्या मुदतीप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज भरु शकतात.

१. ऑनलाईन आवेदन अर्ज सुरू होण्याचा दिनांक व वेळ :-
२. ऑनलाईन आवेदन अर्ज भरण्याची अंतिम दिनांक व वेळ :-
३. स्टेट बँकेत बँकेत पैसे भरण्याची शेवटचा दिनांक :-

५. पोलीस दलातील पोलीस शिपाई या पदावरील निवडीसाठी उमेदवारांकडे खालील नमूद वय शैक्षणिक व शारिरीक पात्रता असणे आवश्यक आहे:-

**अ. वय -** दिनांक................ रोजी वय कमीत कमी १८ वर्षे जास्तीत जास्त २५ वर्षे (मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत शासनाने वेळोवेळी ठरविलेल्या धोरणानुसार उच्चतम वयोमर्यादत सूट देय राहिल.)

**ब. शैक्षणिक अर्हता :-** महाराष्ट्र माध्यामिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महा.अधिनियम ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता १२ वी) किंवा शासनाने या परिक्षेस समकक्ष म्हणून घोषित केलेली परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**क) शारीरिक पात्रता :-**

| | महिलांकरिता | पुरुषांकरिता |
|---|---|---|
| i) उंची .. | १५५ सें. मी. पेक्षा कमी नसावी | १६५ से. मी. पेक्षा कमी नसावी |
| ii) छाती.. | .. .. .. | न फुगवता ७९ से. मी. पेक्षा कमी नसावी व न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ से. मी. पेक्षा कमी नसावा |

**ब. पोलीस बॅन्ड -**

अ) **शैक्षणिक अर्हता:** बँड पथकासाठी महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षा उत्तीर्ण.

ब) **शारीरिक पात्रता:** बँड पथकाच्या भरतीसाठी आलेल्या उमेदवारांच्या बाबतीत या नियमाच्या उप नियम (१) च्या खंड (क), उपखंड (i) व (ii) मध्ये विहीत केलेल्या शारीरिक पात्रतेमध्ये खालीलप्रमाणे सवलत देण्याचे अधिकार अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील:-

i) उंची :- २.५ से. मी. महिला व पुरुष उमेदवारांसाठी

ii) छाती :- २ से. मी. न फुगविता व १.५ से. मी. फुगवुन

क) **अनुभव व इतर अटी: i)** बॅन्ड पथकातील पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना बॅन्ड पथकातील वाद्यांची माहिती असणे व वाद्य वाजविण्याचा अनुभव असणे आवश्यक राहील.

ii) पोलीस बँड पथकातील उमेदवार निवडीसाठी गठीत करावयाच्या समितीत शक्यतो भारतीय सैन्य दलाच्या बँड पथकातील अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात यावा.

iii) पोलीस बँड पथकातील निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना पोलीस मुख्यालयातील अन्य कर्तव्यही बजावणे आवश्यक राहील.

iv) पोलीस बँड पथकासाठी निवड करण्यात आलेले उमेदवार कार्यकारी शाखेत बदलीसाठी पात्र असणार नाहित मात्र हे उमेदवार जिल्ह्याच्या बाहेर फक्त इतर पोलीस घटकातील बँड पथकात बदलीस पात्र ठरतील.

नक्षलग्रस्त भागासाठी विशेष तरतुदी, खेळाच्या प्रवर्गाकरिता उंचीमधील सुट, व पोलीस दलातील कर्मचायांच्या कुटूंबियांच्याबाबत अनुज्ञेय असलेली सूट https://mahapolice.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**ड)** सर्व प्रमाणपत्र अर्ज भरावयाच्या शेवटच्या दिनांकापर्यंत प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

अर्ज ऑनलाईन अथवा महा ई-सेवा केंद्राद्वारे (C.S.C.) भरता येतील. महा ई-सेवा केंद्र (C.S.C.) केंद्रांची यादी व आवश्यक माहिती https://mahapolice.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. सदर परीक्षेकरीता परीक्षा शुल्क रु. १५०/- आहे.

या पोलीस शिपाई भरतीचे सर्व नियम व अर्ज करण्याची पद्धत, इत्यादी https://mahapolice .mahaonline .gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

****

**WIRELESS MESSAGE** **P: CRASH**

TO:- ALL COMMISSIONERS OF POLICE,(INCLUDING RAILWAY)
ALL SUPDT.S OF POLICE, (INCLUDING RAILWAY)
ALL COMMANDANTS, SRPF GROUP 1 TO 16.

INFO:- DG ACB/ ADGP SRPF/ADGP L&O/ ADGP ESTT./PRINCIPAL SECRETARY IT, MANTRALAY (BY HAND)/CRO, M.S., MUMBAI/ ADGP CID, PUNE/ALL RANGE IGP/SPL.IGP, SRPF, PUNE/SPL.IGP, SRPF, NAGPUR/DIGP GADCHIROLI RANGE/ALL PRINCIPAL, POLICE TRAINING CENTRE

FROM:- ADDL. DGP, TRG. & SPL. UNITS, M.S. MUMBAI

O.NO.:- TRG./ADVT./ PB-2014/2014/- 170 DATED, 25/04/2014

TEXT:-

REFER THIS OFFICE CIRCULAR NO. ADGP/TRG./P.R.-2014/GUIDELINES/2014/1779 DATED 23/04/2014, REGARDING POLICE RECRUITMENT - 2014.

1. IT HAS NOW BEEN DECIDED THAT THE ADVERTISEMENT SHOULD BE PUBLISHED ON 30/04/2014(.) REQUESTED TO TAKE NECESSARY ACTION FOR PUBLISHING THE ADVERTISEMENT AS GIVEN IN THE CIRCULAR UNDER REFERENCE(.) PLEASE REFER TO THE FRESH COPY OF THE MODIFIED ADVERTISEMENT PUT UP ON WEBSITE(.) (2) CANDIDATES REQUIRED TO PRODUCE DOMICILE CERTIFICATE AT THE TIME OF VERIFICATION(.) (3) THE APPLICATION FEES REDUCED TO RS. 125 FROM PROPOSED RS. 150(.) (4) APPLICATIONS TO BE ACCEPTED ONLINE FROM 1000 HRS. OF 05/05/2014(.) APPLICATIONS WILL BE ACCEPTED TILL 2200 HRS. ON 25/05/2014(.) (5) LAST DATE FOR ACCEPTING PAYMENT AT THE SBI BRANCHES WILL BE DURING THE WORKING HRS. ON 26/05/2014(.) (6) CUT OFF DATE FOR THE AGE OF THE CANDIDATES SHALL BE 30/04/2014(.) (7) CUT OFF DATE FOR THE CANDIDATES TO OBTAIN ALL CERTIFICATES INCLUDING DOMICILE CERTIFICATE SHALL BE 25/05/2014(.)

ADGP SRPF TO ENSURE SUITABLE CHANGES IN THIS ADVERTISEMENT ACCORDING TO THEIR RULES (.)

ABOVE SCHEDULE IS TENTATIVE AND SHALL BE CONFIRMED IN DUE COURSE(.) REQUESTED TO HOLD IN READINESS(.)

2574

**( S.P. Gupta )**
Addl. Director General Of Police,
Training & Spl. Units,
M. State, Mumbai